# ठाणे महानगरपालिका, ठाणे

वर्तकनगर प्रभाग समिती,
दिनांक :- 31/05/2008

## मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा
## सभा सुचना क्र. 02 दिनांक 27/05/2008
## सभा क्रमांक 02 दिनांक 31/05/2008

**सन्मा. श्री. /श्रीमती** ------------------------

सदस्य / सदस्या - वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा **शनिवार दिनांक 31/05/2008 रोजी सकाळी 11.30 वा.** वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, 2 रा मजला, येथे सभा सुचना क्र. 02 दिनांक 27/05/2008 रोजीच्या विषय पत्रिकेवरील विषयावर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली होती.

### सदर सभेस उपस्थित असलेले सदस्य :-

| | | |
|---|---|---|
| **1)** | **सन्मा. श्री. बळीराम वासुदेव नईबागकर** | **अध्यक्ष** |
| 2) | सन्मा. श्री. रामभाऊ लहु फडतरे | सदस्य |
| 3) | सन्मा. श्री. दिनेश मनोहर पाथरे | सदस्य |
| 4) | सन्मा. सौ. ताई मारुती भोंडवे | सदस्या |
| 5) | सन्मा. सौ. अनिता अशोक सावंत | सदस्या |
| 6) | सन्मा. सौ. वनितातार्इ गंगाराम इंदिसे | सदस्या |
| 7) | सन्मा. सौ. छाया मनोहर राव | सदस्या |
| 8) | सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले | सदस्य |
| 9) | सन्मा. श्री. संतोष हरिश्चंद्र मोरे | स्वि. सदस्य |
| 10) | सन्मा. श्री. संजय तुकाराम कदम | स्वि. सदस्य |

### सदर सभेस अनुपस्थित असलेले सदस्य :-

| | | |
|---|---|---|
| 1) | सन्मा. श्री. नागसेन गंगाराम इंदिसे | सदस्य |
| 2) | सन्मा. श्री. सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| 3) | सन्मा. श्री. हरीश्चंद्र श्रीपत पाटील | सदस्य |
| 4) | सन्मा. श्री. प्रताप बाबुराव सरनाईक | सदस्य |
| 5) | सन्मा. श्री. सुधीर प्रल्हाद बर्गे | सदस्य |
| 6) | सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे | सदस्य |
| 7) | सन्मा. कु. योगिता रमेश वैती | सदस्या |
| 8) | सन्मा. श्री. सुनिल आबाजी शिंदे | स्वि. सदस्य |

**( मा. प्रभाग अधिकारी श्री. भगवान बाविस्कर सभेचा अजेंडा वाचून सभेला सुरुवात करतात. )**

**सन्मा. सदस्य श्री. दिनेश पाथरे** :-

मा. अध्यक्ष महोदय, माझी या ठिकाणी एक तक्रार आहे. आजच्या सभेचा अजेंडा व्यवस्थित प्रिंट न झाल्यामुळे वाचता येत नाही. यामध्ये काय लिहिले आहे ते समजत नाही.

**मा. अध्यक्ष महोदय :-**

याबाबत प्रभाग समितीचे लघुलेखक यांना कालच विचारणा करण्यात आली आहे. प्रिंटरमध्ये दोष असल्यामुळे तसे झाल्याचे त्यांनी सांगितले आहे. पुढील अजेंडा व्यवस्थित प्रिंट करण्यात यावा.

**सन्मा. सदस्या सौ. वनितातार्इ इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागामध्ये भिमनगर, सार्इनाथनगर या परिसरात पाण्याची भीषण समस्या निर्माण झाली आहे. त्याठिकाणी 6" पार्इप लार्इन टाकली आहे. सार्इनाथनगर येथे पार्इप नसल्याने काम थांबल्याचे समजते. काय अडचण आहे ? याबाबत संबंधित अधिकाब्यांकडे विचारणा केली असता एक अधिकारी दुसब्या अधिकाब्याकडे चौकशी करण्यास सांगतात. हे किती दिवस चालणार ? अधिकाब्यांची फिरवाफीरवी चालू आहे. यामध्ये नागरीकांचे हाल होत आहेत.

**श्री. मोहन कलाल** (उप अभियंता- पाणी पुरवठा) :-

मा. अध्यक्ष महोदय, आपल्या प्रभागामध्ये प्रकल्पाअंतर्गत तीन ठिकाणी काम चालू आहे. पाणी पुरवठयामध्ये वाढ करण्यात आली आहे. भिमनगर या भागात पाण्याचा दाब कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. सदर ठिकाणी एका ठिकाणाहून पाणी सोडल्यानंतर शेवटच्या भागापर्यंत पाणी पोहचेपर्यंत प्रेशर कमी होते. शेवटच्या भागात पाणी मिळत नाही. यासाठी आपण पाण्याच्या पुरवठयात वाढ केली आहे. आता यापुढे दोन तीन दिवसांत पाण्याचा पुरवठा भरपूर होणार आहे. सार्इनाथनगर जवळील 4 " पार्इप लार्इनचा प्रश्न आहे. त्याबाबत आता आपल्याकडे पार्इप उपलब्ध झालेले आहेत. ब्रम्हांडजवळ आपले पार्इप आहेत. तेच याठिकाणी वापरण्यात येणार आहेत. फक्त एकच अडचण आहे की, सदरचे काम बी.एम.सी. च्या पार्इपलार्इन जवळ असल्याने अडचण येऊ शकते.

**सन्मा. सदस्या सौ. वनिताताई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, पाणी खात्याने त्याठिकाणी काम चालू करावे. काही अडचण आल्यास आम्ही आपल्या बाजूने समोर उभे राहू. परिसरातील नागरीक आपल्या पाठीशी आहेत. पाण्याची समस्या गंभीर आहे. पाणी प्रश्न सोडविण्याच्या आड कोणी येणार असेल तर आम्ही त्याठिकाणी समोर उभे राहून प्रश्न सोडवू. तुम्ही तुमची कार्यवाही सुरु करा.

याचबरोबर माझ्या प्रभागातील पोलिस लाईनच्या बाजूने पाईपलाइन करण्यात यावी. पूर्वीची पाईपलाईन या परिसरातील इमारतींना वळसा घालून गेली आहे. त्यामुळे पाण्याचा दाब कमी असल्याचे समजते. या परिसरात 4" पाईप लाईन टाकण्यात यावी. सदरची पाईपलाईन वर्तकनगर येथील इमारत क्र. 56 च्या बाजूने टाकण्यात यावी. यापूर्वी आम्ही समजत होतो की, आचार संहिता आहे. त्यामुळे काम बंद आहे. परंतु आता आचारसंहिता संपलेली आहे. कामाला आता गती आली पाहिजे.

**श्री. मोहन कलाल** (उप अभि. - पाणी पुरवठा) :-

मा. अध्यक्ष महोदय, पाणी खात्यात कामाचा व्याप मोठा आहे. त्याप्रमाणात कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. उपलब्ध असलेल्याच कर्मचाऱ्यांकडून काम करवून घेतले जाते. सन्मा. सदस्यांच्या तसेच नागरीकांच्या तक्रारीचे स्वरुप पाहता खुपच कमी प्रमाणात कर्मचारी आहेत. यासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. तरच व्यवस्थित काम करता येऊ शकेल.

**सन्मा. सदस्या सौ. वनिताताई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, साईनाथनगर येथील नाल्याची साफसफाई केव्हा करणार ? पावसाळा तोंडावर आलाय.

**श्री. दिपक आहिरे** (उ. मु. स्व. नि.) :-

मा. अध्यक्ष महोदय, साईनाथनगर येथील नाल्याची साफसफाई दोन-तीन दिवसांत सुरु करण्यात येईल.

**सन्मा. सदस्या सौ. वनिताताई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील गटारांच्या बाजूने खड्डे झालेले आहेत. त्याचा नागरीकांना त्रास होत आहे. ते पावसाळयापूर्वी बुजविण्यात यावे.

**श्री. रामदास शिंदे** (कार्य. अभियंता - सार्व. बांधकाम) :-

मा. अध्यक्ष महोदय, आपण जागेवर जाऊन पाहणी करुन खड्डे बुजविण्याची कार्यवाही करु. सदर ठिकाणी भरणी करुन लेव्हल करु.

**सन्मा. सदस्या सौ. वनिताताई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागामध्ये भिमनगर येथे ठाणे महानगरपालिकेने शौचालयासाठी बोअरींग करुन दिले आहे. सदर बोअरींगमधील पाणी शौचालयाच्या टाकीत सोडण्यासाठी विद्युत पंप देखील बसवून दिला आहे. परंतु त्याठिकाणी अद्याप वीज कनेक्शन करुन देण्यात आलेले नाही. शौचालयात पाण्या अभावी मोठयाप्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. याबाबत संबंधितांकडे गेल्या सहा महिन्यांपासून पाठपुरावा करत आहे. परंतु काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**श्री. रोकडे** (उप अभि. - विद्युत) :-

मा. अध्यक्ष महोदय, सदर ठिकाणी दोन - तीन दिवसांत जवळच असलेल्या विद्युत पोलवरुन वीज पुरवठा करण्याची व्यवस्था करुन देण्यात येईल.

**सन्मा. सदस्य श्री. दिनेश पाथरे :-**

मा. अध्यक्ष महोदय, प्रभाग क्र. 10 मध्ये शौचालय बांधण्यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून प्रयत्न करीत आहे. त्याठिकाणी काही अनधिकृत बांधकामे झाल्याने अडचण असल्याचे समजते. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर फोन वरुन बोललो आहे. परंतु प्रत्यक्षात काम केव्हा चालू होणार आहे. अधिकाऱ्यांमध्ये कामाचे बाबत समन्वय नाही. त्याची माहिती मिळावी काम होणार नसेल तर त्यांनी तसे सांगावे उगाच उडवाउडवीची उत्तरे देवू नये. सदर ठिकाणी उद्घाटनाची तारीख निश्चित करण्यात आली होती. 29 तारखेला उद्घाटन करण्यासाठी मा. उप महापौर, मा. आमदार व इतर पदाधिकारी येणार होते. परंतु त्याठिकाणी काम झालेले नसल्याने उद्घाटन रद्द करावे लागले आहे. याबाबत संबंधितांनी याठिकाणी स्पष्टीकरण करावे.

**सन्मा. सदस्य श्री संतोष वडवले :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील नाले सफाई कितपत झाली आहे याची माहिती सभागृहात देण्यात यावी.

**श्री. दिपक आहिरे** (उ. मु. स्व. नि. ) :-

मा. अध्यक्ष महोदय, मैत्री पार्क ते तारांगण पर्यंतचा नाला सफाईसाठी घेण्यात आला आहे. सन्मा. सदस्य श्री. वडवले यांचे प्रभागातील नाल्याची साफसफाई झालेली आहे.

**<u>सन्मा. सदस्य श्री संतोष वडवले</u> :-**

मा. अध्यक्ष महोदय, संबंधित अधिकारी चुकीची माहिती देत आहेत. त्याठिकाणी अद्यापही नाला साफ केलेला नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी त्याठिकाणी 25 तारखेला म्हणजे निवडणूकीच्या दिवशी पोकलेन मशिन आणून आम्हाला नालेसफाई सुरु करुन पाहणी करणेसाठी सांगितले. परंतु सदर दिवशी आम्ही त्याठिकाणी कसे येणार होतो ? संबंधितांनी त्याठिकाणी नाल्यातील कचऱ्याची फक्त लेव्हल केली आहे.

प्रभागातही यांचे सफाई कामगार कुठेही दिसत नाहीत. कधी तीन माणसे पाठविल्याचे सांगतात तर कधी पाच माणसे पाठविल्याचे सांगतात. परंतु प्रत्यक्षात एकही कर्मचारी यांचा काम करतांना दिसत नाही. जे नगरसेवक यांना शिव्या घालतात त्यांचे प्रभागात 10 - 12 कामगार पाठवितात. आम्ही काही बोलत नाही त्याचा असा गैरफायदा घेतला जातो. दुसऱ्या दिवशी यांना विचारणा केली असता आम्ही कामावर होतो असे सांगतात. माझ्याकडे यांचे कामाबाबत सविस्तर माहिती आहे. यांना फोन केला तर हे सांगतात आता माणसे उपलब्ध नाहीत. इतर ठिकाणी माणसे पाठविल्याचे सांगतात.

यांचे खात्याचे कर्मचारी निवडणूकीच्या दिवशी बुथवर बसलेली पाहिलीत. त्यांचे फोटो घेतले आहे. व्हिडीओ शुटींग देखील करण्यात आले आहे. ते मी मा. आयुक्त सो. यांचेकडे सादर करणार आहे. कर्मचारी मिळणेसाठी यांचेकडे केविलवाणे होऊन विनंती करावी लागते. तरीही त्यांचे कर्मचारी येत नाहीत. काम चालू असतांना थोडे बाजूला गेलो तर लगेचच यांचे कर्मचारी निघून जातात.

**श्री. चंद्रकांत पष्टे** (स्व. निरीक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य श्री. संतोष वडवले यांचे प्रभागात मी पाच कर्मचारी दिलेले आहेत. परंतु या महिन्यामध्ये बरेच कर्मचारी हक्क रजेवर गेले असल्याने सध्या तीन कर्मचारी या प्रभागामध्ये काम करीत आहेत. क्वचित काही प्रसंगी दोनच कर्मचारी काम करतात. सन्मा. सदस्यांच्या प्रभागातील विजयनगर व संत ज्ञानेश्वरनगर येथे तीन कर्मचारी काम करतात. या कर्मचाऱ्यांना मे महिन्यामध्ये हक्क रजेवर सोडले नाही तर ते वैद्यकीय रजेवर जातात. त्यामुळे त्यांना हक्करजेवर सोडण्यात येते.

**<u>सन्मा. सदस्य श्री संतोष वडवले</u> :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागात आपण केव्हाही पाहणी करावी. सफाई कामगार काम करतच नाहीत. तसेच माझ्या प्रभागातील दोन तीन ठिकाणी नाले बांधणे आवाश्यक आहे.

नाल्याच्या भिंती तुटलेल्या आहेत. संबंधित ठेकेदाराला सांगूनही काम करत नाही. त्याला आपल्या स्तरावरुन आदेश देण्यात यावेत.

**<u>सन्मा. सदस्य श्री रामभाऊ फडतरे</u> :-**

मा. अध्यक्ष महोदय, आपल्या कारकिर्दीतील प्रभाग समितीची ही पहिलीच सभा आहे. या आगोदर सन्मा. सदस्या सौ. वनितातार्ई इंदिसे या वर्षभर काम करीत असतांना बऱ्याच वेळा जबाबदार अधिकारी सभेला येत नव्हते. ज्याप्रमाणे प्रभाग समितीची रचना करण्यात आली आहे. त्या प्रभाग समिती अंतर्गत कामे करावयाची असतात. ती कामे त्या पध्दतीने होत नाहीत. परंतु आज तरी कमीतकमी प्रत्येक खात्याचे जबाबदार अधिकारी आलेले आहेत. माझी आपणास विनंती आहे की, पावसाळयाला सुरुवात झालेली आहे. आणि पावसाळयातील महत्वाची कामे आहेत ती - नाले दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती, गटारे दुरुस्ती व सफाई इत्यादी. आता प्रत्येक खात्याच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी आपापल्या खात्यांतर्गत काय काय उपाययोजना केली आहे ती प्रथम सभागृहाला सांगावी. प्रत्येक प्रभाग समितीला आपल्या खात्यातर्फे काय काम चालू आहे याची माहिती प्रत्येक खात्याच्या वतीने सांगावी. कारण लोकप्रतिनीधींनी कालच्या स्थायी समितीच्या सभेत चर्चा केल्याप्रमाणे सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी एकत्रित मिळून काम केले तरच काम होईल. अन्यथा काम होणार नाही. यापैकी तातडीची कामे कोणती आहेत ? आणि ती कधी सुरु होणार आहे ? याबाबतची माहिती देण्यात यावी.

**श्री. रामदास शिंदे** (कार्य. अभियंता - सार्व. बांधकाम) **:-**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ फडतरे यांनी केलेल्या सुचना रास्त आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्याअंतर्गत कामे सुरु केलेली आहेत. यामध्ये रस्ते दुरुस्तीची 80% कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरीत कामे 5 जून पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहेत. यामध्ये येऊर, उपवन, सिध्दांचल, वसंतविहार, पोखरण रोड नं. 1 व 2, कोरस, येथील रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे झालेली आहेत. रस्त्यांच्या दुरुस्ती संदर्भात सन्मा. सदस्यांच्या काही सुचना असतील तर त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येईल.

नाले सफाईबाबत 67% काम पूर्ण झालेले असून उर्वरीत कामही 5 जुन पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. आता आपल्याकडे पोकलेन मशिनही उपलब्ध झालेले आहे. याबाबत सन्मा. सदस्यांच्या काही सुचना असतील तर त्यांनी त्या सांगाव्यात त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

गटारांवरील चेंबर्स कव्हर बसविणेबाबत आपण मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते इत्यादी कामासाठी विविध ठिकाणी ठेकेदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. गटारांची दुरुस्ती व चेंबर्स कव्हर बसविणेचे प्रस्ताव मंजुर नसले तरीही कामे सुरु केली आहेत. यासाठी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, गेल्यावर्षी ज्याप्रमाणे आपआपला निधी या कामासाठी उपलब्ध करुन दिला त्याचप्रमाणे याही वर्षी आपण निधी उपलब्ध करुन देणेबाबत सहकार्य करावे. त्यामुळे आपले प्रभाग व्यवस्थित ठेवण्यास मदत झाली आहे. यावर्षीही असेच सहकार्य कराल अशी अपेक्षा करतो.

माती उचलणे यासाठी आपल्या समितीला तीन लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. आज जो निधी उपलब्ध आहे त्यातून वर्षभर चेंबर्स कव्हर बसविणेसाठी वापरला जाणार आहे. कारण चेंबर्स कव्हर नेहमीच चोरीला जातात. ठेकेदाराला वर्षभरासाठी चेंबर्स कव्हर बसविण्याचे काम दिले आहे.

**सन्मा. सदस्या सौ. वनिताताई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील मागासवर्ग निधी इतर कामासाठी वापरण्यात येवू नये. ऐनवेळी काय काम करावे लागेल याची शाश्वती नसल्याने ऐनवेळी निधीची कमतरता भासू नये. गेल्यावेळी मला अचानक काम करावे लागले परंतु त्यासाठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही.

**श्री. रामदास शिंदे** (कार्य. अभियंता - सार्व. बांधकाम) **:-**

मा. अध्यक्ष महोदय, आपल्याला कामे करण्यासाठी एकूण सात लेखाशिर्ष दिलेले आहेत. यापैकी कोणत्याही एका निधीचा वापर अन्य कामासाठी करु शकतो.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

माती उचलणेसाठी तीन लाख रुपये दिलेले आहेत ते फारच कमी वाटतात. पुढील वर्षी तो वाढवून घ्यावा.

**श्री. रामदास शिंदे** (कार्य. अभियंता - सार्व. बांधकाम) **:-**

मा. अध्यक्ष महोदय, तीन लाख रुपये पूर्ण प्रभागासाठी आहेत. आपल्या प्रभाग समितीचे क्षेत्रफळ सर्वात जास्त आहे. ठाणे महानगरपालिकेच्या एकूण क्षेत्रफळाच्या 30% एवढे आहे. सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ फडतरे यांचा प्रभाग क्षेत्रफळाने सर्वात मोठा आहे.

शौचालय दुरुस्तीसाठी निर्मल अभियान अंतर्गत कामे सुरु आहेत. तसेच नाल्यावरील फुटब्रीजची दुरुस्तीची कामेही 05 जुन पर्यंत पूर्ण करणार आहोत. तसेच विविध ठिकाणी असलेल्या गतिरोधकांची (स्पीड ब्रेकर) रंगरंगोटी करण्याची कामे करणार आहोत. याबाबत सन्मा. सदस्यांच्या सुचनांप्रमाणे कामे करण्यात येतील. गटारांच्या संदर्भात काही कामे करणे आवश्यक आहे. सन्मा. सदस्या सौ. इंदिसे यांचे प्रभागामध्ये गटारांचे दुरुस्तीचे काम सुरु केले आहे. तसेच सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ फडतरे यांचेही प्रभागातील कामाला सुरुवात केली आहे. पोखरण रोड नं. 2 येथे गटारांची साफसफाई सुरु केली आहे. यामध्ये उघडया गटारांचीही साफसफाई सुरु केली आहे. सदर ठिकाणी 12 फुट खोलीपर्यंत काम पूर्ण होणार आहे. या विषयी सन्मा. सदस्यांच्या काही सुचना असतील तर त्यांचीही अंमलबजावणी केली जाईल.

**श्री. मोहन कलाल** (उप अभियंता - पाणी पुरवठा) :-

मा. अध्यक्ष महोदय, वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत पाणी पुरवठा विभागामार्फत प्रकल्पाअंतर्गत 9.5 इंची व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्यात येत आहेत. तसेच डब्ल्यु. बी. एम. ची कामे 80% पूर्ण झालेली आहेत. डांबरीकरणाची कामे 90% पूर्ण होत आली आहेत. उर्वरीत कामे 5 जुन पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी जलवाहिन्या नव्याने टाकण्यात आल्या आहेत तर काही ठिकाणी जलवाहिन्या शिप्टींग करण्यात आल्या आहेत. एका ठिकाणी रहिवाशांनी विरोध केल्यामुळे ते काम बंद ठेवण्यात आले आहे. याबाबत संबंधितांविरुध्द पोलिस स्थानकात तक्रार दाखल करुन लवकरच काम सुरु करण्यात येणार आहे.

पावसाळयात आपातकालीन कक्ष सुरु करण्यात आला असून त्यामध्ये 04 प्लंबर व 04 बिगारी कर्मचाब्यांचा समावेश करण्यात आला आहे. तक्रार प्राप्त होताच तातडीने निवारण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदरचा कक्ष महापालिकेच्या मुख्यालयात 01 जून पासून कार्यान्वीत होणार आहे. त्यासाठी 108 क्रमांक देण्यात आला आहे. त्यावर फोन केल्यास आपण संबंधितांशी संपर्क करु शकतात.

लक्ष्मीपार्क, यशोधन नगर, लोकामान्यनगर या परिसरात नविन पाईपलाईन टाकण्याचे काम चालू आहे. सदरचे काम 10 जून पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. याबाबत सन्मा. सदस्यांच्या सुचना असतील तर त्याचीही अंमलबजावणी करण्यात येईल. यामध्ये मुख्यतः प्रकल्पाअंतर्गत जी कामे करत आहोत त्या ठिकाणी काही जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत.

सन्मा. सदस्यांनी त्यांचे प्रभागातील जलवाहिन्या शिफ्टींग करावयाच्या असतील किंवा नाल्यामधून गेल्या असतील तर त्याची माहिती लेखी पत्रान्वये द्यावी. त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. या कामाचा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. सदरची कामे पावसाळयापूर्वी किंवा जास्तीत जास्त सप्टेंबर महिन्यापर्यंत पूर्ण होणार आहेत.

**सन्मा. सदस्या सौ. ताई भोंडवे** :-

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील सुरकरपाडयात एका ठिकाणी जलवाहिनीतून गळती सुरु आहे. तेथे दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. काझी** (उप अभियंता - पाणी पुरवठा) :-

मा. अध्यक्ष महोदय, त्याठिकाणी पाहणी केली आहे. जलवाहिनीतून गळती सुरु आहे. आजच कर्मचारी पाठवून दुरुस्ती करण्यात येईल.

**सन्मा. सदस्या सौ. वनितााताई इंदिसे** :-

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागात 2" जलवाहिनी टाकण्याचे काम सुरु केले होते. त्याठिकाणी नागरीकांनी छोटी लाईन टाकत असल्याने विरोध केला आहे. याबाबत म्हाडामधील नागरीकांचाच विरोध आहे. त्याठिकाणी काम सुरु करण्यात यावे. पूर्वी ज्याठिकाणाहून जोडणी केली आहे तेथूनच नविन लाईन जोडून द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे. यासाठी 4 - 5 पाईप जादा लागतील. तरी ते काम करण्यात यावे.

**सन्मा. सदस्या सौ. ताई भोंडवे** :-

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील रौनकपार्क येथे गांधीनगर येथून आलेल्या जलवाहिनीला पुरेसे पाणी नसल्याने नागरीकांना पाणी मिळत नाही. तेथे पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**श्री. मोहन कलाल** (उप अभियंता - पाणी पुरवठा) :-

मा. अध्यक्ष महोदय, काही दिवसांपूर्वी आमच्या खात्यातील अधिकाऱ्यांना निवडणूकीच्या कामासाठी घेण्यात आले होते. त्यामुळे पाण्याच्या टाक्या पूर्णपणे भरल्या गेल्या नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांनी दोन तीन वेळा शटडाऊन घेतल्याने पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता.

आता पुन्हा पूर्वीप्रमाणे शेडयुल्ड करण्यात आले असून गेल्या दोन दिवसांपासून आम्ही सर्व अधिकारी गांधीनगर येथील पाण्याच्या टाकीजवळ बसून कामकाज सुरु केले आहे. पाणी पुरवठयात सुधारणा झालेली आहे. आता आपल्याला 6 mlt. जादा पाणी उपलब्ध करुन दिले आहे. रौनकपार्क येथे 200 मीटर लांबीची जलवाहिनी टाकण्यात येत आहे. समतानगर येथील परिसरालाही पूर्वी 17 mlt. पाणी पुरवठा होत होता आता या परीसरात 24 mlt. पाणी पुरवठा करण्यात येत आहे. वाढीव पाणी मिळणार आहे. काही ठिकाणी जलवाहिनी बदलणे व दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. प्रकल्पाच्या जलवाहिनीसाठी पाईप मिळण्यास उशिर झाल्याने सर्वच कामांना उशिर होत आहे.

**सन्मा. सदस्या सौ. वनितानाताई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, प्रभाग समितीसाठी पंपसेटसह टँकर खरेदी करणार होते त्याचे काय झाले ? कुठपर्यंत आली कार्यवाही ? याबाबत माहिती देण्यात यावी.

**श्री. काझी** (उप अभियंता -पाणी पुरवठा) :-

मा. अध्यक्ष महोदय, यासाठी ड्रायव्हर नसल्याने टँकर खरेदी केलेला नाही.

**सन्मा. सदस्या सौ. वनिताताई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, सर्वच विभागांत कर्मचारी अपुरे आहेत. पाणी खात्यालाही कनिष्ठ अभियंता वाढवून घ्यावेत.

**मा. उप आयुक्त सौ. वर्षा दिक्षित :-**

मा. अध्यक्ष महोदय, याबाबत मला कल्पना आहे. माझेकडे ऑर्डर्स आलेल्या आहेत. लवकरच स्टाफ उपलब्ध करुन देण्यात येईल. पाणी खात्यातील कर्मचाऱ्यांची मागणी बऱ्याच दिवसांपासून आहे. त्यादृष्टिने आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागातील बिगारी कर्मचारी पाणी खात्याकडे वर्ग केले आहेत.

**सन्मा. सदस्या सौ. वनिताताई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागातील जे बिगारी पाणी खात्याकडे आले त्यांचे काय केले याबाबत माहिती देण्यात यावी. त्यांचेवर नियंत्रण कोणाचे आहे ?

**श्री. काझी** (उप अभियंता - पाणी पुरवठा) :-

मा. अध्यक्ष महोदय, पाणी खात्याकडे जे कर्मचारी आहेत. त्यांचेवर आम्हाला नियंत्रण ठेवण्यास वेळ मिळत नाही. महापालिकेने आम्हाला सुपरवायझर दिले तर कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवता येवू शकते.

**मा. उप आयुक्त सौ. वर्षा दिक्षित :-**

मा. अध्यक्ष महोदय, सुपरवायझरच्या एकूण 10 जागा रिक्त असून त्यावर नियुक्ती करणेस मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिली आहे. लवकरच पाणी खात्याला सुपरवायझर उपलब्ध करुन दिले जातील.

**श्री. सुनिल पोटे** (उप अभियंता - विद्युत) :-

मा. अध्यक्ष महोदय, विद्युत विभागाच्यावतीने पावसाळयापूर्वी करावयाच्या कामांना सुरुवात केलेली आहे. यामध्ये बऱ्याच ठिकाणी जुने विद्युत पोल बदलण्यात आले आहेत. काही पोल सडलेल्या अवस्थेत होते ते देखील बदलण्यात आले आहेत. जवळ जवळ 80% काम पूर्ण झालेले आहे. विद्युत पोलवरुन वीज चोरी होत असते. ती होऊ नये म्हणूनही उपाययोजना करण्यात आल्या आहेत. वीज चोरांविरुध्द वेळोवेळी कारवाई करण्यात येत असते. तसेच काही वायरमन कर्मचारी आपातकालीन कक्षात बसणार आहेत. काही कर्मचारी फायर ब्रिगेड विभागाकडे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. प्रभागांची नियमितपणे पाहणी केली जाते. दरवर्षी पावसाळयात ज्या तक्रारी येतात त्या बहुतकरुन एम.एस.ई.बी. विभागाशी संबंधित असतात. यावर्षी एम.एस.ई.बी. विभागाला विनंती करण्यात आली आहे. त्यांनीही आपातकालीन कक्ष सुरु करण्यास संमती दर्शविली आहे. आम्ही त्यांचेशी समन्वय साधून आहोत. बहुतांश तक्रारी Fuse उडाल्यामुळे केल्या जातात. त्या महापालिकेशी संबंधित नसतात. एम.एस.ई.बी. च्याही तक्रारी आपल्याकडेच येतात. त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.

**सन्मा. सदस्य श्री. संतोष मोरे :-**

मा. अध्यक्ष महोदय, लक्ष्मी - चिरागनगर मधील केबलवाल्याने नागरीकांच्या घरांवरुन केबल टाकल्या आहेत. त्याबाबत 19 तारखेला तक्रार केली आहे. परंतु अद्याप त्या केबल काढण्यात आल्या नाहीत व त्यांचेवर कारवाई देखील करण्यात आलेली नाही. उद्या काही प्रसंग निर्माण झाला तर त्याला जबाबदार कोण ?

**श्री. सुनिल पोटे** (उप अभियंता - विद्युत) :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्यांच्या तक्रारी प्रमाणे मोठी मोहिम राबवून कारवाई करावी लागणार आहे. यासाठी आम्हाला एक डंपर व चार-पाच बिगारी कर्मचारी उपलब्ध झाले तर त्याठिकाणी जलद कारवाई करता येणे शक्य आहे. ज्याक्षणी डंपर व बिगारी उपलब्ध होतील त्याक्षणी कारवाईला सुरुवात करु. त्याठिकाणी टाकलेल्या केबल कापून जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल. नुसत्याच केबल कापून टाकल्या तर त्यातून वीज प्रवाह होऊन एखादी दुर्घटना घडू शकते. आज आमच्याकडे साधनसामग्री उपलब्ध नाही. नुसतेच केबल कापून टाकल्यास रस्त्यावर अडथळे निर्माण होऊ शकतात.

**<u>सन्मा. सदस्य श्री. दिनेश पाथरे</u> :-**

मा. अध्यक्ष महोदय, यावर्षी आपण उद्यानासाठी बोअरींगचा प्रस्ताव पास केला होता. बोअरींगच्या ठिकाणी रेन वॉटर हॉर्वेस्टींग करणेबाबत सुचनाही केली होती. आपल्या प्रभाग समिती कार्यालयातही पाण्याची टंचाई असल्याने बाथरुम व टॉयलेट मधून दुर्गंधी येते. प्रभाग समिती कार्यालयातील उद्यानात बोअरींग केले आहे. त्याठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टींग करण्यात यावे. माझा स्वतःचा असा अनुभव आहे की, बोअरींगला रेन वॉटर हार्वेस्टींग केले तर बोअरींगचे पाणी कायम स्वरुपी मिळेल. अवघ्या तीस फुटांवर देखील यामुळे पाणी मिळते. रेन वॉटर हॉर्वेस्टींग न केल्यास एक दोन वर्षात त्याठिकाणचे पाणी संपते व सदरचे बोअरींग निकामी होते. यामुळे महापालिकेचा मोठयाप्रमाणावर पैसा वाया जातो. 100 ते 350 फुट खोल बोअरींग करुनही पुरेसे पाणी मिळत नाही. रेन वॉटर हॉर्वेस्टींगमुळे प्रभाग समिती कार्यालयास पाण्याची कमतरता भासणार नाही.

**<u>सन्मा. सदस्या सौ. वनिताताई इंदिसे</u> :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागात पाण्याची समस्या निर्माण होत असल्याने त्याठिकाणी पाण्याच्या टाक्या बसविणेस सांगितले होते. परंतु अजूनही दोन-तीन टाक्या बसविण्याची आवश्यकता आहे. याबाबत मी लेखी पत्र देखील दिले आहे. ज्या टाक्या बसविण्यात आल्या आहेत. त्या वरच्या बाजूने तुटल्या आहेत. त्यामुळे पाण्याच्या टाक्या अर्ध्या भरल्यानंतर पाणी वाया जाते. त्याठिकाणी सिडी नसल्याने वरुन पाईप टाकावा लागतो. त्यामुळेच टाकी तुटली असणार.

**श्री. काझी** (उप अभियंता - पाणी पुरवठा) :-

मा. अध्यक्ष महोदय , याबाबत तातडीने पाहणी करण्यात येईल. आवश्यक तेथे नविन टाक्या बसवून देण्यात येतील. तसेच त्याठिकाणी दोन इंची पाईपलाईन टाकून देण्यात येईल.

**श्री. सुनिल मोरे** (उद्यान निरिक्षक ) :-

मा. अध्यक्ष महोदय, उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत झाडांच्या धोकादायक फांद्या छाटण्याचे काम करण्यात येते. यासाठी सन्मा. सदस्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार पाहणी करण्यात येते. झाडांच्या फांद्या छाटण्यासाठी वरीष्ठ अधिकाऱ्यांची परवागी घ्यावी लागते. फांद्या छाटण्याचे काम वृक्ष प्राधिकरण विभागाचे आहे. या विभागासाठी पाच कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. पैकी एक कर्मचारी महापौर बंगल्यावर आहे. एक कर्मचारी सतत रजेवर असतो. उर्वरीत तीन कर्मचाऱ्यांमार्फत काम करुन घेतले जाते. आमचेकडे डंपर उपलब्ध नाही. उद्यान विभागाचा डंपर आहे परंतु तो चालक नसल्यामुळे जागेवरच उभा आहे. सध्या फांद्या छाटण्याचे काम सुरु केले आहे. आजच सन्मा सदस्य श्री. पालांडे साहेबांचे प्रभागातील झाडांच्या फांद्या छाटण्याचे काम सुरु केले आहे. पावसाळयात धोकादायक फांद्या छाटण्यासाठी आम्ही अतिरीक्त कर्मचाऱ्यांची मागणी केली आहे. महापालिकेच्या मुख्यालयात आपातकालीन कक्ष स्थापन करण्यात आला असून त्याठिकाणीही आमचे कर्मचारी उपलब्ध असणार आहेत.

**श्री. रामदास शिन्दे** (कार्य. अभियंता- सार्व. बांधकाम)

मा. अध्यक्ष महोदय, मा. आयुक्त सो. यांनी आदेश दिलेले आहेत. साधन सामग्री उपलब्ध नसेल तर ती भाडयाने घेण्यात यावी. त्यासाठी विशेष अधिकार देण्यात आला आहे.

**मा. उप आयुक्त - सौ. वर्षा दिक्षित :-**

मा. अध्यक्ष महोदय, उद्यान विभागासाठी जो कर्मचारी वर्ग दिलेला आहे. तो उद्यानांची देखभाल करतो. त्यांना कामासाठी डंपर नसेल तर तो त्यांनी बाहेरुन भाडयाने घेवून काम सुरु करावे. तसेच ज्या फांद्या छाटण्यात येतात त्या रस्त्यावर पडून राहता कामा नये. त्या लवकरात लवकर उचलण्यात याव्यात.

**श्री. सुनिल मोरे** (उद्यान निरिक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, याबाबत फेडरेशनकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

**सन्मा. सदस्या सौ. वनितातार्ई इंदिसे :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील एका झाडाच्या फांद्या धोकादायक असून त्या नागरीकांच्या घरावर आल्या आहेत. त्या छाटण्यात याव्या. याबाबत तक्रार दिली आहे.

**मा. उप आयुक्त - सौ. वर्षा दिक्षित :-**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्यांच्या तक्रारीनुसार वृक्ष प्राधिकरण विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

**श्री. सुनिल मोरे** (उद्यान निरिक्षक ) :-

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य ज्यावेळी तक्रार करतात त्यावेळी तक्रारीनुसार काम करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे परवानगी घ्यावी लागते. यामध्ये बराच वेळ जातो. तातडीने कारवाई करता येत नाही. प्रत्येकवेळी वृक्ष अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. तक्रार प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांचे आत कारवाई करणे आवश्यक असते परंतु तसे होत नाही.

**श्री. दिपक आहिरे** (उप मु. स्व. निरीक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, प्रभाग समितीअंतर्गत एकूण 23 नाले आहेत. त्यांची लांबी सुमारे 14,700 मी. एवढी आहे. पैकी 9700 मी. गटारांची साफसफाई करण्यात आली आहे. 67% काम पूर्ण झालेले आहे. उर्वरीत काम 5 जून पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**सन्मा. सदस्या सौ. अनिता सावंत :-**

मा. अध्यक्ष महोदय, माझ्या प्रभागातील नाले साफ करण्याचे काम चालू आहे. त्याठिकाणी नाल्यातील कचरा काढून बाजूला टाकण्यात आला आहे. परंतु तो उचलला नाही. त्यामुळे तो पुन्हा गटारात जात आहे. तो तातडीने उचलण्यात यावा.

**श्री. दिपक आहिरे** (उप मु. स्व. निरीक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, आजच कचरा उचलण्याचे काम सुरु करणार आहे. किमान 100 डंपर भरतील एवढा कचरा उचलणेची कार्यवाही सुरु केली आहे. आज रात्री उशिरापर्यंत ते काम सुरु राहणार आहे.

**सन्मा. सदस्या सौ. अनिता सावंत** :-

मा. अध्यक्ष महोदय, मोठया प्रमाणात कचरा उचलण्याचे काम बाकी आहे. त्यासाठी फायलेरीयाचे कर्मचारी मागवून घेण्यात यावे.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

आरोग्य विभागाकडे सद्या किती कर्मचारी उपलब्ध आहेत ? किती कर्मचारी काम करतात ? किती कर्मचारी रजेवर आहेत ? याची सविस्तर माहिती सभागृहाला देण्यात यावी.

**श्री. दिपक आहिरे** (उप मु. स्व. निरीक्षक) :-

मा. अध्यक्ष महोदय, सद्या मे महिना चालू असल्याने शाळेला सुट्टया असल्याने मोठया प्रमाणावर कर्मचारी रजेवर जातात. कर्मचारी अपुरे पडत आहेत. सन्मा. सदस्यांच्या सुचनेनुसार फायलेरीया विभागाचे कर्मचारी मागवून घेतो.

**सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ फडतरे** :-

मा. अध्यक्ष महोदय, पावसाळयापूर्वी व पावसाळयामध्ये ज्या ज्या उपाययोजना करणे अत्यंत महत्वाचे आहे त्या सर्व संबंधित खात्यातील म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, पाणी पुरवठा विभाग व उद्यान तथा वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रभागानुसार आपापल्या खात्याने जी जी कामे चालू केली आहेत त्यांचे विवरण केले आहे. परंतु आता प्रभाग समितीमध्ये अधिकाऱ्यांचे प्रमुख म्हणून सहाय्यक उप आयुक्त आहेत. त्यांची जी कमिटी आहे त्या कमिटीने, सर्व अधिकाऱ्यांनी सन्मा. सदस्यांशी संपर्क साधण्यासाठी आपापले मोबाईल व फोन नंबर्स द्यावेत. फोन नंबर देण्याचे कारण म्हणजे बऱ्याचवेळा अधिकाऱ्यांचे मोबाईल बंद असतात. आपल्यामध्ये कम्युनिकेशन असले पाहिजे तरच आपल्याला ही कामे करता येतील. अधिकारी जेव्हा एखाद्या प्रभागामध्ये काम सुरु करतो त्यावेळी त्या प्रभागाच्या सन्मा. सदस्यांना प्राधान्याने कळविले पाहिजे. त्यामुळे जी समस्या निर्माण झाली आहे ती सोडवण्यासाठी निश्चितपणे आपल्याला फायदा होईल. सार्वजनिक बांधकाम विभागाने फाईल तयार केली आहे परंतु त्यास मंजुरी नसेल तर काम न थांबविता तातडीची उपाययोजना म्हणून जी कामे तातडीची आहेत ती प्राधान्याने करुन घेण्यात यावी. तशा सुचना मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या आहेत. नालेसफाई, गटारेसफाई किंवा पावसाळयामध्ये कुठे पाणी साचते, कुठे गटारे साफ झालेली नाहीत, लोकप्रतिनिधींना याची माहिती असते. असे नाले तातडीने साफ करणे आवश्यक आहे.

कामात तातडीने सुधारणा झाली पाहिजे ती करीत असतांना सन्मा. सदस्यांना बरोबर घेतले पाहिजे. अधिकारी जेव्हा प्रभागात काम करतात त्यावेळी त्याठिकाणी नागरीक किंवा कार्यकर्ते असतात त्यांना पुरेशी माहिती नसते. काम व्यवस्थित होत नाहीत. रस्ते दुरुस्तीच्या बाबतीत महत्वाचे रस्ते तातडीने दुरुस्त झाले पाहिजेत.

त्याचप्रमाणे विद्युत विभागाशी संबंधित काही महत्वाचे प्रश्न असतात. तातडीने जुन्या केबल बदली करण्यात याव्यात.

उद्यान विभागाला कर्मचारी नाहीत. त्यांना साधनसामग्री उपलब्ध नाही असे अधिकाऱ्यांनी सांगु नये. याबाबत उप आयुक्त यांचेशी चर्चा करुन काम सुरु करण्यात यावे. सर्वच सन्मा. सदस्यांना तुमची माहिती आहे. तुम्ही जी झाडे तोडतात ती उचलणेही आवश्यक आहे. ती तशीच पडून राहिल्यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण होते. पावसाळयामध्ये कर्मचाऱ्यांना सुट्टया देता कामा नये जे कर्मचारी काम करत नाहीत त्यांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी सन्मा. सदस्यांना दिली पाहिजे. सर्व अधिकाऱ्यांबरोबरच मुकादमांचे फोन नंबर देण्यात यावेत. कर्मचारी कुठेतरी असतात त्यांचे मोबाईल लागत नाहीत. कर्मचारी कुठे तर अधिकारी कुठे अशी परिस्थिती निर्माण होते. पाणी खात्याने एखादे ठिकाण निश्चित करावे. त्यांची जागा निश्चित नसल्याने त्यांना कुठे शोधायचे. ज्याठिकाणी असतील त्याठिकाणचे मोबाईल व फोन नंबर देण्यात यावे. अधिकाऱ्यांनी आता त्यांचे फोन 24 तास चालू ठेवावे. अन्यथा पावसाळयात एखादा अनर्थ घडल्यावर सर्वांनाच धावपळ करावी लागते. त्यापूर्वीच कारवाई झाली पाहिजे. काही कर्मचारी कामच करत नाहीत. बदली करायची तर करा असे सांगतात. कनिष्ठ अभियंता श्री. पांचाळ यांनी काम केले नाही त्यांना विचारले असता माझी बदली करा असे सांगतात. बदली होत नाही म्हणून काम करायचे नाही असे नाही हे ठीक नाही. मला याठिकाणी अधिकाऱ्यांबाबत बोलायचे नाही. परंतु ज्यावेळी कामाचा पाठपुरावा करतो त्यावेळी नागरीक आम्हाला सतत विचारणा करतात त्यावेळी आम्ही त्यांना काय सांगायचे ? यासाठीच आम्ही तुम्हाला बोलत असतो. तातडीची बाब म्हणजे तक्रारीवर तातडीने कारवाई झाली पाहिजे. आता आपला पाणी पुरवठा वाढणार आहे. माझ्याकडेही काही समस्या आहेत. आम्हीही महापालिकेचे नियमित करदाते आहोत. त्यामुळे ज्या ज्या सन्मा. सदस्यांच्या सुचना असतील त्यावर तातडीने उपाययोजना करावी आणि ही जी कामे करावयाची आहेत ती सन्मा. सदस्य आणि अधिकारी यांनी मिळून केली तर कोणताही अनर्थ घडणार नाही. याबाबत निश्चित काळजी घेतली पाहिजे. आपल्याच प्रभाग समितीमध्ये काम चालू आहे इतर समितीमध्ये काय काम चालू आहे हे पाहण्याची आवश्यकता नाही.

अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांचेमध्ये समन्वय असला पाहिजे. याबाबत आपल्याकडून निश्चितच कामे होतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. कालच मा. स्थायी समितीमध्ये मा. सभापती, मा आयुक्त सो. यांनी आदेश दिले आहेत. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी कामाला सुरुवात करावी. प्रत्येक वेळी बैठक लावण्याची आवश्यकता नाही. सर्व सन्मा. सदस्यांनी मा. अध्यक्ष व मा .उप आयुक्तांबरोबर कामांची पाहणी करण्यासाठी प्रभागातील दौरा करावा. दौरा करीत असतांना जी जी कामे तातडीची व महत्वाची आहेत. त्यास प्राधान्य दिले पाहिजे. इतर कामे होतच राहतात. पावसाळयासाठी तातडीची उपाययोजना करण्यात यावी. मा. उप आयुक्त व मा. अध्यक्ष यांनी सर्व सन्मा. सदस्यांना बरोबर घेवून वेळोवेळी प्रभागाचा दौरा करावा. त्यामुळे नागरीकांनाही वाटेल काही तरी कामे सुरु आहेत. नागरीकांनाही दिलासा मिळेल. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.
जय हिंद.... जय महाराष्ट्र !

**सन्मा. सदस्य श्री. संतोष मोरे** :-

मा. अध्यक्ष महोदय, ज्युपिटर हॉस्पिटल जवळील कॅडबरी जं. ते माजिवडा पर्यंत या ठिकाणी गटारांची साफसफाई करण्यात यावी. कॅडबरी येथील चिरागनगर येथे चेंबर कव्हरचे काम झाले आहे. संबंधित ठेकेदाराला किरकोळ कामे करण्यास सांगितले असता त्याने वाढीव पेमेंट मिळणार नसल्याने काम करण्यास असमर्थता दर्शविली. त्याने संबंधित कनिष्ठ अभियंत्याला सांगण्याची सुचना केली. कनिष्ठ अभियंता नसेल तर काम होणार नाही का ? कनिष्ठ अभियंता त्याठिकाणी पाहणी करायलाही येत नाहीत. त्याठिकाणी कामांची पाहणी कोण करणार ? तुम्ही कनिष्ठ अभियंत्यांना सुट्टी कशी देतात ? माहे जानेवारीमध्ये फाईल मंजुरीसाठी पाठविली आहे. अजुनही मंजुरी मिळालेली नाही. अशा गोष्टी का होतात ? नागरीकांना आम्ही काय तोंड देणार ?

**श्री. रामदास शिंदे** (कार्य. अभियंता - सार्व. बांधकाम) :-

मा. अध्यक्ष महोदय, सार्व. बांधकाम खात्यामार्फत जी पावसाळयापूर्वीची कामे करवयाची आहेत त्याचे विवरण सादर केले आहे. त्यामध्ये काही गोष्टी सांगायच्या विसरलो. त्यामध्ये रस्त्यांच्या बाजुला जे मटेरीयल आहे त्यापैकी जी प्राधान्याने कामे करावयाची आहेत त्याबाबत पाहणी करुन काम सुरु केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने माती उचलणे, रस्ते साफसफाई करणेबाबत सांगितले आहे. तसेच काही वेदरशेड व शौचालयांची दुरुस्ती, रस्ते दुरुस्तीची कामे 10 ते 12 जून पर्यंत पूर्ण होणार आहेत.

आरोग्य खाते, पाणी खाते, विद्युत विभाग यांचेमध्ये समन्वय साधून कामे करणार आहोत. आय. एन.डी. पी अंतर्गत कामे असतील तर त्याबाबत कृपया श्री. हिर्लेकर साहेबांना कळविण्यात यावे. सन्मा. सदस्य श्री. मोरे यांनी कॅडबरी जं. ते माजिवडा जं. पर्यत गटारांची साफसफई बाबत सुचना केली आहे. कॅडबरीजवळच्या नाल्यावर गेल्यावर्षी चेंबर स्पेसिंगचे काम केले आहे. कॅडबरी कंपनी जवळील भिंतीचे मोजमाप घेतले आहे. काम लवकरच सुरु होईल. त्या ठिकाणची गटारे उघडी ठेवणार असल्याने पाण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. आपण मा. अध्यक्षांबरोबर प्रत्यक्ष पाहणी दौरा करणार आहोत. कनिष्ठ अभियंता नसला तरी ठेकेदाराला मी कार्य. अभियंता म्हणून आदेश देवू शकतो. याबाबत सन्मा. सदस्यांनी माझेशी संपर्क साधावा.

**सन्मा. सदस्य श्री. संजय कदम :-**

मा. अध्यक्ष महोदय, समतानगर येथील समतानगर को. ऑ. हौ. सोसायटीच्या आवारात एका अनधिकृत इमारतीचे बांधकाम झाले आहे. ती पूर्ण तोडणेबाबत मा. न्यायालयाने आदेश दिले आहेत. ती महापालिका का तोडत नाही ?

**श्री. भगवान बाविस्कर** - प्रभाग अधिकारी :-

मा. अध्यक्ष महोदय, सदर इमारतीतील रहिवाशांना निष्काशित केल्यानंतरच इमारत पाडण्यासाठी घेता येईल. रहिवाशांना निष्काशित करणेबाबत नियमानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 268 (1)(2)(3) व (5) नुसार नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. निष्काशनाची कारवाई पूर्ण होताच कारवाई करण्यात येईल.

**मा. अध्यक्ष महोदय** :-

सर्व सन्मा. सदस्य, उप आयुक्त सौ. दिक्षित, प्रभाग अधिकारी श्री. बाविस्कर आणि येथे उपस्थित सर्व अधिकारी वर्ग...

आजची ही सभा माझ्या अध्यक्षतेखालील पहिलीच सभा आहे. यासभेमध्ये ज्या सन्मा. सदस्यांनी तक्रारी केल्या आहेत. त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनीही उत्तरे दिली आहेत. सन्मा.सदस्य श्री. रामभाऊ फडतरे यांनी संबंधितांना मार्गदर्शन केले आहे. पहिलीच सभा असून या सभेला सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी विशेष करुन विद्युत विभागाचे, पाणी खाते, बांधकाम खाते व उद्यान विभागाचे अधिकारी उपस्थित आहेत. या सर्वांना मी धन्यवाद देतो. यापुढीलही सभांना सर्व अधिकारी उपस्थित राहतील अशी अपेक्षा करतो. यापूर्वीच्या सभांना संबंधित खात्याचे अधिकारी येत नसे यापुढे असे होता कामा नये.

मा. उप आयुक्त यांनी अधिकरी वर्ग उपस्थित नसेल तर प्रभाग समितीची बैठक घेवून उपयोगच नाही. नुसते सभापती पद भूषविण्यासाठी मी याठिकाणी आलो नाही. काही सन्मा. सदस्यांनी तक्रार केली आहे. त्याप्रमाणे कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. त्याबद्दल आपल्या समितीच्या बांधकाम खात्याचे श्री. रामदास शिंदे यांनाही मी धन्यवाद देतो. जरी सहा महिन्यांपासून एखादी फाईल मंजुर झालेली नसेल तरी फाइलच्या मंजुरीची वाट न पाहता कार्यवाही सुरु करण्यात यावी. पाणी खात्यानेही प्रभागात विविध ठिकाणी कामे सुरु केली आहेत. त्याबद्दल मी श्री. कलाल यांचे विशेष आभार मानतो. श्री. कलाल हे फार प्रामाणिकपणे व मेहनतीने काम करीत असल्याचे मी गेल्या 10 दिवसांच्या अनुभवातून सांगतो. त्यांना मी विनंती करतो की, मी सभापती असल्याने फक्त माझ्याच प्रभागात काम करु नका तर मी 15 प्रभागांचा सभापती असल्याने सर्वच प्रभागात कामे सुरु करावी. विशेषतः पावसाच्या काळामध्ये तातडीने कामे करावीत. या प्रभाग समितीक्षेत्रातील लोक माझे आहेत. माझ्या कुटुंबातीलच आहेत असे समजून त्यादृष्टिने काम केले पाहिजे. आपण एक अधिकारी आहात म्हणून आपण वेगळया पध्दतीने वागू नका. फोन बंद ठेवू नका. आमचा अनुभव आहे की, रात्रीचे 1.00 ते 2.00 वा. च्या दरम्यान पावसाचे पाणी लोकांच्या घरात चढलेले आहे. त्यामुळे लोकांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. तरी या पावसाळयामध्ये आपातकालीन कक्षामध्ये उपस्थित राहून डोळयात तेल घालून काम केले पाहिजे. ज्यावेळी सन्मा. सदस्यांना अडचणी येतात त्यावेळी सन्मा. सदस्य व अधिकारी यांनी समन्वय ठेवून काम करावयाचे आहे. आरोग्य खात्याचे श्री. आहिरे हेही चांगले अधिकारी आहेत. आपण एका प्रभागात 12 कर्मचारी दिले असे सांगतात परंतु तसे होत नाही. कर्मचारी वर्गात वाढ झाली पाहिजे. यादृष्टीने प्रयत्न करा. पाणी खात्यामध्ये फक्त 36 कर्मचारी वर्ग आहे. तो पुरेसा नाही. यामध्ये फक्त एकच प्लंबर आहे. कनिष्ठ अभियंता एकच आहे. यामध्ये वाढ झाली पाहिजे. त्यांना सुपरवायझर उपलब्ध करुन दिला पाहिजे. पाणी खात्याची अवस्था फारच बिगट आहे. नगरसेवकांना नागरीकांच्या तक्रारींना तोंड द्यावे लागते. पाणी खात्याने विशेष लक्ष दिले पाहिजे. माझ्याकडे बजेटची कॉपी उपलब्ध आहे. त्यामध्ये विविध हेड दिले आहेत. यासर्व हेड नुसार स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. परंतु ती पुरेशी वाटत नाही. आपल्या समितीतील पाच सदस्य स्थायी समितीवर आहेत. त्यांनी वाढीव निधी मंजुर करुन द्यावा.

महत्वाची गोष्ट म्हणजे उद्या आपण प्रमुख अधिकाऱ्यांबरोबर पाहणी दौरा आयोजित केला आहे. सकाळी 9.30 वा. या ठिकाणी यावे. या दौऱ्याबाबत श्री. हिर्लेकर यांनाही कल्पना देण्यात यावी. ज्या सन्मा. सदस्यांनी सुचना केल्या आहेत. त्यामध्ये अधिकऱ्यांनी लक्ष द्यावे.

**प्रभाग अधिकारी विषय पत्रिकेवरील विषय क्र. 2 व 3 वाचून दार्खवितात.**

**सर्वानुमते मंजूर**

**सदर सभेत खालील विषयांना मंजुरी देण्यात आली.**

**ठराव क्रमांक:- २ विषय** :- ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. १२ दिनांक ३१/०३/२००८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक २ दिनांक ३१/०५/२००८

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. १२ दिनांक ३१/०३/२००८ रोजीच्या सभेचे इतिवृत्त सदस्यांच्या सुचनेसह ही समिती वाचून कायम करीत आहे.

**सुचक :-श्री. दिनेश मनोहर पाथरे अनुमोदक :- श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

सही

**अध्यक्षा**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**ठराव क्रमांक:- ३ विषय** :- ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समिती अध्यक्ष पदाच्या निवडीची सभा क्र. ०१ दिनांक ०३/०४/२००८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ३ दिनांक ३१/०५/२००८

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समिती अध्यक्ष पदाच्या निवडीची सभा क्र. ०१ दिनांक ०३/०४/२००८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सदस्यांच्या सुचनेसह ही समिती वाचून कायम करीत आहे.

**सुचक :-श्री. दिनेश मनोहर पाथरे अनुमोदक :- श्री. संतोष वसंत वडवले**

सर्वानुमते मंजूर

सही

**अध्यक्षा**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**तद्नंतर मा. सभापती महोदय दुपारी 1.25 वा.  सभा संपल्याचे जाहिर करतात.**

**अध्यक्ष**
वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
सभा संपल्याची वेळ दु. 1.25 वा.
दिनांक 31/05/2008

**प्रभाग अधिकारी**
वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.